

# 'आयपॅड'वर मराठी पुस्तके!

'ॲमेझॉन डॉट कॉम'च्या धर्तीवर भारतीय पुस्तके ऑन लाइन विकण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम अमेरिकेतील 'मायविश्व' कंपनीचे मालक मंदार जोगळेकर यांनी या आठवड्यात सुरू केला. त्याचे रीतसर उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार व संशोधक-समीक्षक डॉ. अरुण टिकेकर यांच्या हस्ते झाले. या वेबसाईटचे नाव आहे 'बुकगंगा डॉट कॉम'. जोगळेकरांनी कागदी पुस्तके विकण्याबरोबरच E पुस्तकेदेखील विकणे सुरू केले आहे. ॲपलच्या आयपॅडवर ही पुस्तके किती सुगमतेने वाचता येतात याचे प्रात्यक्षिक त्यांनी दाखवले तेव्हा डॉ. टिकेकर उत्स्फूर्तपणे उद्गारले, की लोकांना पुस्तक न वाचण्यास आता कोणतीही सबब राहिलेली नाही. कारण आयपॅडवर आडवे-उभे, टाइप मोठा करून, संदर्भ ठेवून.. कसेही वाचता येऊ शकते. स्लेटपाटी आकाराच्या आयपॅडमध्ये सर्वसाधारण आकाराची दहा हजार पुस्तके मावतात. आयपॅड सहजपणे कोठेही नेता-आणता येते. त्यामुळे 'आपल्याबरोबर फिरणारे हे ग्रंथ संग्रहालयच होय' असे डॉ. टिकेकर यांनी त्याचे वर्णन केले.



'मायविश्व' कंपनीचे मालक मंदार जोगळेकर

जोगळेकर म्हणाले, की आयपॅडची अमेरिकेतील किंमत पाचशे डॉलर आहे. भारतात ते पंचवीस-तीस हजार रूपयांत मिळू शकेल. हळुहळू, त्याच्या किंमती कमी होत जातील.

आयपॅडवर इ-बुक स्वरूपातील मराठी पुस्तके भरण्याचे तंत्र जोगळेकर यांनी विकसित केले आहे. ही इ-बुक्स बरीच स्वस्त असतील. साधारण शंभर डॉलरमध्ये पंचवीस पुस्तके मिळू शकतील व 'आयपॅड'मध्ये ती तहहयात राहतील. अमेय व मेहता या प्रकाशकांनी त्यांची निवडक टायटल्स 'इ-बुक'साठी जोगळेकरांच्या स्वाधीन केलीदेखील.

'बुकगंगा डॉट कॉम'बद्दल जोगळेकर म्हणाले, की फक्त भारतीय भाषांतील व भारतात निर्माण झालेली इंग्रजी पुस्तके या साइटवर मिळू शकतील. सध्याची ऑनलाइन विक्री अधिकतर परदेशी पुस्तकांसाठी उपलब्ध आहे. फक्त भारतीय भाषांसाठी ही सोय प्रथमच होत आहे. भारतात इलेक्ट्रॉनिक पेमेंट फार सुकर नसल्याने बँकेमार्फत व्यवहार करण्याचाही बेत आहे.

धडाडीचा मराठी तरुण जगातील मोठ्या ग्रंथव्यवहाराला टक्कर देण्यास निघाला आहे. त्याला शुभेच्छा देण्यासाठी रुइया कॉलेजच्या हॉलमध्ये मराठी प्रकाशक, लेखक व पत्रकार हजर होते.

**- प्रतिनिधी**